# निर्देश पत्र
# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि. ठाणे ४०१ १०१ दुरध्वनी क्र : २८१९२८२८ / २८१९३०८७

(..........सचिव.......... विभाग)

क्रमांक :

तारीख :

| विषय | मा. स्थायी समिती सभा.<br>सभा सूचना क्र ०१<br>दि १०/०४/२०१७ रोजी स. ११-०० वा |
|---|---|

प्रकरण क्र १ ते १०

प्रकरण सुरू झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग (अ/ब/क/त-१/ड) | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०३/०४/२०१७.

## मा.स्थायी समिती

**सभा सूचना क्रमांक ०१**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती.________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १०/०४/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. सभापती, स्थायी समिती यांचे मान्यतेने.**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०१, विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचेइतिवृत्तांत –** |
| ०१ | दि. १०/०२/२०१७, दि. १३/०२/२०१७ (दि. १०/०२/२०१७ रोजीची तहकुब सभा) व दि. १७/०२/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)**-निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ०२ | महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांची सेवा खंडीत करुन नव्याने नेमणूक देणेबाबत. |
| ०३ | मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागातील सब स्टेशन ऑफीसर श्री. धनंजय वसंतराव कनोजे यांच्या अपिल अर्जावर विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |
| ०४ | वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेख विवरण पत्र (सन २०१५-१६) तयार करणेबाबत. |
| ०५ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बांधकाम व पाणी पुरवठा विभागामार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विकास व देखभाल दुरुस्ती कामांवर नियंत्रणासाठी Geo Tagged Project Monitoring System साठी रिध्दी मॅनेजमेंट प्रा.लि. यांची नेमणूक करण्यास मान्यता देणेबाबत. |
| ०६ | महापालिका जागेवर प्रदुषण व वातावरण नियंत्रणदर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करण्यासाठी कंत्राटदार नियुक्ती करणे कामांची निविदा मंजूरी बाबत. |
| ०७ | स्थायी समिती सभापती स्वेच्छा निर्णय निधीतून विकास कामे करणेबाबत. |
| ०८ | धुरफवारणी करीता मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत. |
| ०९ | निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १० | निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

**दिनांक :- ०३/०४/२०१७.**

(वासुदेव शिरवळकर)
**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १०/४/२०१७

### ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र.०२ <u>महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांची सेवा खंडित करुन नव्याने नेमणूक देणेबाबत.</u>

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मा. स्थायी समिती ठराव क्र. १० अन्वये ०४ लघुटंकलेखक यांची किमान वेतन दरानुसार सहा महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यापैकी ०१ लघुटंकलेखकाने राजीनामा दिलेला आहे. उर्वरित ०३ लघुटंकलेखक कार्यरत आहेत.

मा.महासभा ठराव क्र.१३८ अन्वये व दि.०३/०३/२०१६ रोजीच्या मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आयुक्त यांना सर्व विभागाचे किमान वेतनाबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी प्राधिकृत केल्यानुसार किमान वेतन दरानुसार लघुटंकलेखक यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लघुलेखकाची नावे | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री.रविंद्र नागनाथ चव्हाण | लघुटंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग |
| २. | श्री.अनिल तुकाराम बहिरम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |
| ३. | श्री.गुणवंत दयाराम सपकाळे | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |

मा.स्थायी समिती सभा दि.१०/०२/२०१७ प्रकरण क्र.१०८ ठराव क्र.१०३ अन्वये सदर लघुटंकलेखकांच्या नियुक्तीस दि.१७/०३/२०१७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्याअन्वये सदर लघुटंकलेखकांची मुदत दि.१७/०३/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे.

महानगरपालिका मा.महासभा, मा.स्थायी समिती सभा, आयुक्त व उपायुक्त (मुख्यालय) यांचे बैठकांचे इतिवृत्तांत, प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृत्तांत लिहीण्यासाठी लघुटंकलेखकांची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार तात्पुरत्या नेमणुकीसाठी मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

महानगरपालिकेच्या कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर लघुटंकलेखक यांना दि.२०/०३/२०१७ ते दि.१९/०९/२०१७ पर्यंत ०६ महिन्यांकरीता नव्याने नेमणुक देणेस मा.स्थायी समितीस शिफारस आहे.

(डॉ. नरेश गिते)<br>
आयुक्त<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

२४
४.४५

गोषवारा प्राप्त दि.२४/ ३ /२०१० वेळ ४.४५
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र.....१२०.........

लिपीक
नगरसचिव विभाग.

प्रकरण क्र. ३ करिता

श्री. धनंजय वसंतराव कनोजे
सब स्टेशन ऑफिसर,
अग्निशम व आणि बाणी सेवा,
मिरा भाईदर महानगरपालिका.

प्रति,
माननीय स्थायी समिती सभापती,
स्थायी समिती
मिरा भाईदर महानगरपालिका.

विषय :- महाराष्ट्र नागरी सेवा [शिस्त व अपील व वर्तणूक] नियम, १९७९ मधील नियम १७ [२] नुसार अपील.

संदर्भ :- १] सामान्य प्रशासन विभाग, जा.क्र. मिभा/ मनपा/सा.प्र.वि/१६२४/२०१६, दि. २८/१२/२०१६

२] मा. आयुक्त साहेब, मिरा भाईदर महानगरपालिका, भाईदर, जि. ठाणे यांना दिनांक १९/११/२०१६ रोजीचे न्याय मिळणेसाठीचे विनंती पत्र.

महोदय,

मा. आयुक्त, मिरा भाईदर महानगरपालिका यांचा एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखणेबाबतचा आदेश दि. ९/६/२०१६ हा अमान्य असल्यामुळे मी वरील अर्जदार खालील प्रमाणे अपील दाखल करतो की,

१. मी मिरा भाईदर महानगरपालिका आस्थापनेवरील सब-स्टेशन अधिकारी या पदावर कायमस्वरुपी कर्मचारी असून दि. २६/६/२०१० पासून अग्निशमन विभागात कार्यरत आहे. माझे आजपर्यंतचा सर्विस रेकॉर्ड हा समाधानकारक असून मिरा भाईदर महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेले काम / कार्यभार यशस्विरित्या पूर्ण केला आहे व करतो आहे.

२. दि. २२/१/२०१२ रोजीचा आदेश जाक्र. मनपा/उपआयुक्त/१५७/२०१२-१३ नुसार प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी सुट्टीवर असल्यामुळे मला प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणून कार्यभार सोपविण्यात आला होता व तो कार्यभार मी यशस्वीरित्या पूर्ण केला.

३. दि. १५/५/२०१३ चा आदेश मिभा/मनपा/अग्नि/३६०/२०१३-१४ नुसार प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने सदरील पदाचा कार्यभार मला तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आला व तो मी यशस्विरित्या पूर्ण केला.

४. दि. ६/६/२०१३ चा मिरा भाईदर महानगरपालिका यांचा आदेश मिभा/मनपा/उपआयुक्त/अग्नी/५१/२०१३ नुसार दि. १५/५/२०१३ चा आदेश रद्द करुन मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर अधिका-याची नेमणूक होईपर्यंत मला तात्पुरत्या

स्वरुपाचा अग्निशमन दलाचा संपुर्ण कार्यभार सोपविण्यात आला व तो मी जबाबदारीने दि. १३/६/२०१६ च्या आदेशान्वये श्री. प्रकाश बोराडे यांना सोपविण्याचा आदेश होईपर्यंत यशस्विरित्या सांभाळला.

५. दि. २२/५/२०१६ रोजी उत्तन धावगी रोड, येथे घनकचरा प्रकल्पाला आग लागली होती. या दिवशी मला साप्ताहिक रजा होती व मी मुंबई येथे कामानिमित्ताने गेलो होतो. सदरील आगीबाबतची माहिती मला सायंकाळी ६.०५ मिनिटांनी मा. उप-आयुक्त सो, [मुख्यालय] यांचे स्विय सहाय्यक यांनी दिली. तोपर्यंत मी सदरील आगीची काहीही माहिती नव्हती. आगीबाबतची माहिती मिळताच मी भाईदर [प] व सिल्वर पार्क अग्निशमन स्थानकात फोन करुन तात्काळ अग्निशमन वाहने रवाना करण्यास सांगितले. पंरतू त्यापूर्वीच तिन्ही अग्निशमन स्थानकातील वॉटर टेंडर अधिकारी व कर्मचा-यांसह घटनास्थळी पोहचून आग विझवण्याचे कार्य करत होते. आगीच्या घटनास्थळी उपस्थानक अधिकारी श्री. छोटू आदिवाल, श्री. जगदीश पाटील हे उपस्थित होते व मी साप्ताहिक सुटीमुळे मुंबईला असल्यामुळे तात्काळ घटनास्थळी पोहचने शक्य नसल्यामुळे मी फोनवर योग्य त्या सूचना अधिका-यांना दिल्या. व तसेच परिस्थितीनुसार मी सदर घटनास्थळची माहिती मा, उपायुक्त सो.[अग्निशमन ]यांना वेळोवेळी फोनवरुन अवगत करुन दिली, मी सदरहू वर्तणूकीवरुन हे सिध्द होते की मी आपल्या कामात कोणताही कामचूकारपणा किंवा निष्काळजीपणा करत नव्हतो व मी माझे काम परिस्थितीनुसार योग्य प्रकारे केलेले आहे.

६. मी माझ्या कामात कोणताही निष्काळजीपणा केला नसतानाही वरील घटनेबद्दल दि. २४/५/२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस मला दिली व त्यास मी दि. २६/५/२०१६ रोजी माझे उत्तर मा. आयुक्त सो. मिरा भाईदर महानगरपालिका यांना दिले असता मा, उपायुक्त श्री संभाजी पानप्पटटे सो, यांना मा.आयुक्त साहेब रजेवर असल्या कारणाने आयुक्तांचा कार्यभार सोपविण्यात आला होता व दि.२६/५/२०१६ रोजीचा खुलासा यांनी मान्य करुन समज देण्याबाबत कळविले होते. तरी सुध्दा मिरा भाईदर महानगरपालिकेने कोणतेही कारण न देता तसेच कोणतेही आरोपपत्र न देता चौकशी न करता तसेच मला माझी बाजू मांडण्याची संधी न देता दि. ९/६/२०१६ च्या आदेशान्वये मला एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याबाबत चुकीचा आदेश पारित केला.

७. मिरा भाईदर महानगरपालिकेचा हा आदेश कायदयाच्या विरुध्द असून कोणतीही चौकशी किंवा मला माझी बाजू मांडण्याची संधी न देता घेतलेला असल्यामुळे तो खारिज करण्यास पात्र आहे.

८. तसेच वरील एका घटनेसाठी मला दोन शिक्षा देण्यात आलेल्या आहे पहिली १३/६/२०१६ च्या आदेशान्वये मुख्य अग्निशामन अधिकारी या पदाचा कार्यभार काढून घेतला व दुस-या दि. ९/६/२०१६ च्या आदेशान्वये एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याचा आदेश पारित केला जे की कायदयाच्या विरुध्द आहे. एकाच घटनेसाठी दोन शिक्षा देणे हे कायदयाच्या विरुध्द असल्यामुळे सदरील आदेश दि. ९/६/२०१६ हा खारिज करावा.

२८/१२/२०१६ नुसार अपील दाखल करण्याबाबत कळविले आहे व त्यानुसार मी हे अपील वेळेच्या आत सादर करत आहे.

१०. वरील बाबींचे अवलोकन केल्यास मला दिलेली शिक्षा जाणूनबुजून हेतुपुरस्परपणे केल्याचे दिसून येते. माझे काढून घेतलेले अधिकार व सुनावलेल्या शिक्षेमुळे माझे भवितव्य धोक्यात आलेले आहे. वरील आदेशामुळे मला पुढील वाटचालीकरिता अतिशय अडचणींना सामोरे जावे लागले त्यामुळे मला व माझ्या परिवारास मानसिक तणावाखाली जीवन जगावे लागत आहे. त्यामुळे सदरील चुकीचा आदेश दि. ९/६/२०१६ खारीज करण्याची कृपा करावी हि विनंती.

<u>प्रार्थनाः-</u> मी प्रार्थना करतो की,

१. मिरा भाईदर महानगरपालिकेचा आदेश दि. ९/६/२०१६ हा चुकीचा व गैरकायदेशीर आहे असे आदेश करुन एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याचा आदेश रद्द करण्यात यावा.

२. सदरील अपील चालू असेपर्यंत आदेश दि. ९/६/२०१६ स्थगीत करण्यात यावा.

मुंबई.

दि. २२/०२/२०१७

आपला विश्वासू,

Ranjit 22/02/17

[श्री. धनंजय वसंतराव कनोजे]
सब स्टेशन ऑफिसर,
अग्निशम व आणि बाणी सेवा,
मिरा भाईदर महानगरपालिका.

# श्री. राकेश रतीशचंद्र शाह
**नगरसेवक**
**सदस्य - स्थायी समिती**
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे -४०१ १०१.

संपर्क : शॉप नं. ९, शिवनेरी बिल्डींग, बी.पी. क्रॉस रोड नं.४, साऊथ, खारीगांव, भाईदर (पूर्व), जि. ठाणे - ४०१ १०५.मोबाईल : ९८७००९९४४७ / ९९३०३३१७७८

जावक क्र. ______ दिनांक : ____________

**दि. / /२०१७ रोजीच्या स्थायी समितीमध्ये "क" खाली प्रस्ताव घेणेबाबत.**

**प्रकरण क्र..........**

प्रति,
१) मा. सभापती,
स्थायी समिती,
मिरा भाईंदर महानगरपालिका

२) मा. नगरसचिव,
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- स्थानिक संस्था कर विभागातील तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या ऑडीट लिपिक कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत..**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागात मागील सन २०१२ पासून खाली नमुद केलेले ५ कर्मचारी ऑडीट लिपिक या पदावर तात्पुरत्या स्वरुपाच्या ठोक मानधनावर कार्यरत आहेत.

| | |
|---|---|
| १) सुशांत सुर्वे | २) निशा पटेल |
| ३) रविनाथ शिवगण | ४) हेमाली बावकर |
| ५) सचिन सुपूगडे | |

सदर ठिकाणी कार्यरत असलेल्या ५ ऑडीट लिपिकांची दि.०९/०२/२०१७ रोजी मुदत संपुष्टात आलेली आहे. वास्तविक स्थानिक संस्था कर सद्यस्थितीत सुरु आहे याकरीता या विभागात तसेच अथवा महापालिकेच्या अन्य विभागात कर्मचाऱ्यांची अत्यंत आवश्यकता असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५०(३) नुसार नेमणूकीच्या मुदतवाढीकरीता मा. स्थायी समितीची पूर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

तरी सदर ऑडीट लिपिकांच्या सेवेत १ दिवसीय तांत्रिक खंड देवून महापालिकेच्या अन्य विभागात त्यांना ऑडीट लिपिक अथवा लिपिक या पदावर सामावून घेवून त्यांच्या सेवेच्या मुदतवाढीचा विषय "क" नुसार मा. स्थायी समितीपुढे ठेवून त्यांना मुदतवाढ देण्यात यावी हि विनंती.

आपला विश्वासू,

(राकेश आर. शाह)
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.स्थायी समिती सभा, दि.१०/०४/२०१७**

**॥ गोषवारा ॥**

**प्रकरण क्र.:- ०४ वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेख विवरण पत्र (सन २०१५-१६) तयार करणेबाबत.**

**संदर्भ:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९४ नुसार**

प्रतिवर्षी मागील वर्षातील प्रशासन अहवाल, परिवहन उपक्रमाच्या प्रशासन व्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशिलवार अहवाल व उक्त वर्षात महानगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रक्कम व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणाऱ्या विवरणपत्र सहित तयार करुन स्थायी समितीस सादर करणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार प्रस्तावित आहे.

स्थायी समितीने अहवालाची व विवरणपत्राची तपासणी व त्यांचा आढावा घेतल्यानंतर अंतिम मंजूरी नंतर छापील प्रत प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या ठिकाणी किंवा माहित असलेल्या त्याच्या शेवटच्या स्थानिक निवासस्थानी स्थायी समिती वेळोवेळी विहीत करील अशा तारखेपर्यंत पाठविली पाहिजे व त्यांच्या प्रती आयुक्त ठरविल अशा किंमतीस विक्रीसाठी महानगरपालिका कार्यालयात ठेवल्या पाहिजेत.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९४ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ सालातील प्रशासन अहवालास मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**उपायुक्त (मुख्यालय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्राप्त दि. 03/03/2018
वेळ स. 11:20 वा.

गोषवारा प्राप्त दि. / / वेळ
मा. स्थायी समिती /
नोंद रजिस्टर क्र.
लिपीक
नगरसचिव विभाग.

गोषवारा प्राप्त दि 03/03/2018 वेळ 11:20 वा
मा. स्थायी समिती / ~~[illegible]~~
नोंद रजिस्टर क्र. 113
लिपीक 03/03/2018
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि. १० / ४ /२०१७.**

// गोषवारा //

**प्रकरण क्र.:- ( ०५ )** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या बांधकाम व पाणी पुरवठा विभागामार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विकास व देखभाल दुरूस्ती कामांवर नियंत्रणासाठी Geo Tagged Project Monitoring System साठी रिद्धी मॅनेजमेंट प्रा.लि. यांची नेमणूक करण्यास मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकासकामे तसेच मालमत्ता देखाभाल दुरूस्तीची कामे बांधकाम व पाणी पुरवठा विभागामार्फत पार पाडण्यात येतात. सदर कामे मुदतीत करून घेणे, कामावर नियंत्रण ठेवणे इ. साठी यंत्रणा असणे आवश्यक आहे. मुंबई महानगरपालिका प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) विकास कामे व दुरूस्ती कामे यावर नियंत्रण ठेवणेसाठी Geo Tagged Project Monitoring System वापरण्यात येत असून सदर यंत्रणा मे. रिद्धी मॅनेजमेंट प्रा.लि., कोलकता, पश्चिम बंगाल या संस्थेमार्फत पुरविण्यात येत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेत सदर यंत्रणा वापरल्यास कामावर चांगल्या रितीने नियंत्रण ठेवता येऊ शकेल. तरी याबाबत मे. रिद्धी मॅनेजमेंट प्रा.लि. चे प्रतिनिधी सोबत झालेल्या चर्चेनुसार त्यांनी माहिती पाठवून काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. सदर संस्थेस या कामी रू.१५,०००/- प्रति महिना अधिक सर्व्हिस टॅक्स एवढी रक्कम द्यावयाची असून तीन वर्षासाठी करारनामा करावयाचा आहे. सदर यंत्रणा सुरू करण्यासाठी मुंबई महानगरपालिका प्रदेश विकास प्राधिकरणासोबत केलेल्या करारनाम्यानुसार विना निविदा मिरा-भाईंदर महानगरपालिकेसोबत करारनामा करून काम करण्यासाठी कार्यादेश देण्यासाठी महाराष्ट्र *महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये मान्यता देण्यास शिफारस* आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC-6./DK/16-17/ SG-41

गोषवारा प्राप्त दि. २३/३/२०१८ वेळ ११.०
मा. स्थायी समिती / महापालिका गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ९२८

लिपिक
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा.स्थायी समिती सभा दि. १०/४/२०१७

## //गोषवारा//

प्रकरण क्र. ०६ :- महापालिका जागेवर प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करण्यासाठी कंत्राटदार नियुक्ती करणे कामांची निविदा मंजुरी बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महापालिका प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) जागेवर ३० X १५ चौ.फुट आकारमानाचे एकुण ८ फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करणेबाबत ऑनलाईन निविदा दै.दबंग दुनिया व दै.जनमत दि.१९/१०/२०१६ रोजीच्या वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करणेत आली आहे. सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर N.I.C. Tender ID क्र. 161584_ 1 ने प्रसिध्द केली असुन दि.२१/१०/२०१६ ते दि.०५/११/२०१६ या कालावधीत ऑनलाईन फॉर्म विक्री व दि.०५/११/२०१६ रोजी दु.३.०० वा. पर्यंत निविदा स्विकारणेची मुदत देण्यांत आली होती. सदर कालावधीत एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

तद्नंतर सदर निविदेस दि.०६/११/२०१६ ते दि.१६/११/२०१६ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यांत आली. सदर कालावधीत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Tender ID 161584_1 वर ६ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

सदर प्राप्त निविदेमधील तांत्रिक लिफाफा (टेक्नीकल बीड) उघडणेबाबत उपआयुक्त (जाहिरात) यांची मान्यता असुन त्याअनुषंगे जा.क्र.मनपा/जाहिरात/२९९/२०१६-१७ दि.२१/११/२०१६ अन्वये सिस्टीम प्रोग्रामर, ई टेंडरींग विभाग यांना पत्र दिले होते. त्यानुसार निविदेमधील ०६ निविदाधारक यांचे तांत्रिक लिफाफा (टेक्नीकल बीड) दि.२५/११/२०१६ रोजी उघडण्यांत आलेल्या असुन सदर निविदेत मे. फ्रंटऐज मिडीया, इमेज मार्केटींग, व प्राईम स्पॉट आउ्टडोर्स यांनी निविदेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचे फायनान्शीयल बीड मा. निविदा निवड समितीच्या दि.११/०१/२०१७ रोजीच्या मंजुरीने फायनान्शीयल बीड उघडले असता निविदाधारकांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव व टेंडर आय.डी.क्र. | मुल्याधिकारीक रक्कम | निविदा धारकाने सादर केलेले दर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मे. इमेज मार्केटींग | मे. फ्रंटऐज मिडीया | प्राईम स्पॉट आउ्टडोर्स |
| १ | महापालिका जागेवर प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करण्यासाठी कंत्राटदार नियुक्ती करणे 161584_1 | १७,२८,००० (पहिले वर्ष) | १९,००,८०० | १८,५७,६०० | १७,२८,००२ |
| | | १९,००,८०० (दुसरे वर्ष) | २०,९०,८८० | २०,४३,३६० | १९,००,८०२ |
| | | २०,९०,८८० (तिसरे वर्ष) | २२,९९,९६८ | २२,४७,६९६ | २०,९०,८८२ |
| | | ५७,१९,६८० (एकुणरक्कम) | ६२,९१,६४८ | ६१,४८,६५६ | ५७,१९,६८६ |

तरी वरील तक्ता पाहता मे. इमेज मार्केटींग यांनी सादर केलेले दर हे वार्षिक मुल्याधिकारीक रक्कमेपेक्षा व मे. फ्रंटऐज मिडीया व प्राईम स्पॉट आउ्टडोर्स यांचेशी तुलना करता अधिक असल्याने प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करणे कामाचा ठेका मे. इमेज मार्केटींग यांना देण्यास मा.स्थायी समितीस शिफारस असे.

उपआयुक्त (जाहिरात)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.१0 /03/२० वेळ 0५:३0 वा.
मा. स्थायी समिती / ~~महासभा गोषवारा~~
नोंद रजिस्टर अ. क्र. ११४
लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि. १०/ ४ /२०१७.**

// गोषवारा //

**प्रकरण क्र.:- ( ०७ )** स्थायी समिती सभापती स्वेच्छा निर्णय निधीतुन विकास कामे करणेबाबत.

भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र.13 मधील नवघर जुना तलाव येथील उद्यानाचे सुशोभिकरण करण्यासाठी मागणी श्री. हरीश्चंद्र आमगांवकर, सभापती स्थायी समिती यांनी कळविले होते. त्याअनुषंगाने उद्यान विकसित व सुशोभिकरण करण्यासाठी अंदाजपत्रक नकाशे सादर मे. श्री. अतुल कटारीया (लॅण्डस्केप आर्कीटेक्ट सल्लागार) यांच्याकडून तयार करून घेण्यात आलेले असून त्याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1 | भाईंदर (पूर्व) नवघर येथील नवघर जुना तलाव येथील उद्यान विकसित व सुशोभिकरण करणे. | रु.39,99,940/- |

वरील कामासाठी "स्थायी समिती सभापती स्वेच्छा निर्णय निधी" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.1,00,00,000/- तरतुद करण्यात आलेली असून रु.15,72,410/- तरतुद शिल्लक आहे. तथापी सदर कामावर 31 मार्च 2017 पर्यंत खर्च पडणार नसुन सन 2017-18 या वर्षांच्या अर्थसंकल्पातुन होणार आहे. सदर कामाची नोंद रजि.क्र.02 पृ.क्र.75 अ.क्र. 04 वर घेण्यात आलेली आहे. तरी वरील कामास आर्थिक व प्रशासकिय मंजुरीसाठी मा.स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी मान्यता मिळण्यास शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC-3./DK/16-17/ SG-11

गोषवारा प्राप्त दि. 23/3/2018 वेळ 9:22

मा. स्थायी समिती / ~~मनपा सभा~~ गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. 948

लिपीक

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.स्थायी समिती सभा दि. १० / ०४ /२०१७

### ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. :- ०८

**विषय :-** धुरफवारणी करीता मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात डेंग्यू, मलेरिया, इ. किटकजन्य आजारावर नियंत्रण करणेकामी डासनाशके/अळीनाशके फवारणी करिता फॉगिंग मशिन खरेदी करणेस मा. स्थायी समिती सभा दि. ३०/११/२०१६, ठराव क्र. ७८ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली होती.

याअनुषंगाने दि. २७/१२/२०१६ रोजी जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करुन दि. १६/०१/२०१७ रोजी ई-टेंडरद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे दि. २१/०१/२०१७ रोजी उघडण्यात आले प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे उघडले असता मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन मे. रमेश अग्रो केम कॉर्पोरेशन मे. श्रीराम अग्रो एजन्सीज या तिन्ही निविदा कारानी आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडलेली असल्याने मा. निविदा निवडसमितीने दराचे लिफाफे उघडण्यास मंजूरी दिली होती. त्याअनुषंगाने दि. ०२/०३/२०१७ रोजी तिन्ही निविदांचे दराचे लिफाफे उघडण्यात आले. त्यात मे. श्रीराम अग्रो एजन्सीज यांनी सादर केलेले दर सर्वात कमी असल्याने त्यांना वाटघाटी करीता दि. ०९/०३/२०१७ रोजी बोलविण्यात आले असता त्यांनी वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे नविन दर सादर केलेले आहेत.

| SR. NO. | NAME OF PRODUCT | M/S. SHREE RAM AGRO AGENCY | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | TENDER RATE | | | RATE AFTER NEOGOTATION | | |
| | | RATE | RATE WITH 3 YEAR AMC | RATE WITH 3 YEAR AMC | RATE | RATE WITH 3 YEAR AMC | RATE WITH 3 YEAR AMC |
| १ | COLD FOGGING MACHINE | 170990/- | 196490/- | 246140/- | 165000/- | 189600/- | 237500/- |

मे. श्रीराम ॲग्रो एजन्सीज यांनी सादर केलेले दर रु. १,८९,६००/- प्रती मशिन (३ वर्षीच्या वार्षीक देखभाली सहीत) स्वीकारणेकरिता मा. स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर.

(डॉ. नरेश गिते)<br>
आयुक्त<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि २०/ 3 /२०१८ वेळ ५.००

मा. स्थायी समिती / ~~महासभा~~ गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. १२५

लिपीक २०/३/१८

नगरसचिव विभाग.

आ.दा. ८५७ / ९/३/१७ : १०१० / २६३५

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि.१०/०४/२०१७.**

// गोषवारा //

प्रकरण क्र. ( ७९ ) :- निविदेस मान्यता देणेबाबत.

| अ क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च/ ठेकेदाराने सादर केलेले दर | मा. आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. समिती शिफारस दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ |
| १. | 188583_1 | भाईंदर (पुर्व) गोडदेव येथील स्व. इंदिरा गांधी उद्यान विकसीत व सुशोभीकरण करणे **(स्थायी समिती निधी)**<br><br>**मे. एन जे ब्रदर्स**<br>मे. राठोड ब्रदर्स<br>मे. श्री. गणेश इंटरप्रायझेस | **रू.४९,९९,९९०/-**<br><br>**९.००००% जास्त दराने**<br>दरवाटाघाटीनंतर<br>**अंदाजपत्रकीय दराने**<br>९.५०००% जास्त दराने<br>११.००००% जास्त दराने | दि.१६/१२/२०१६ | दि.०२/०३/२०१७ | दै. आपला वार्ताहर,<br>दै. अब्सुलेट इंडिया,<br>दै. महाराष्ट्र सम्राट<br>दि.०६/०१/२०१७ | दि.१०/०१/२०१७ |

वरील दराच्या निविदेस मान्यता देणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC-6/DK/16-17/SG-39

गोषवारा प्राप्त दि. २३/३/२०१८ वेळ ..१.००
मा. स्थायी समिती / महासभा कडे सादर
नोंद रजिस्टर अ. क्र. ...११८.........

नगरसचिव विभाग.

२०३५
२६ ७८

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि.१० /०४/२०१७.**

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (१० ) :- निविदेस मान्यता देणेबाबत.

| अ क्र | टेंडर आय डी क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक | मा. समिती शिफारस दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | 174910_1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील स्वच्छतागृहांची दैनंदिन स्वच्छता निगा / देखभाल करणे | - | - | दि.०९/०३/२०१७ | दै. मुंबई तरूण भारत, सा. पहली खबर दि.०६/१२/२०१६ | दि.०७/१२/२०१६ |

| अ.क्र | संस्थेचे नाव | सादर केलेले दर (प्रति महिना/प्रति मजूर) |
|---|---|---|
| १. | मे. आदर्श सेवा संघ | रू.३०,२७५/-<br>दरवाटाघाटीनंतर<br>रू.२४,०००/- |
| २. | मे. जन सेवा सुविधा संस्था | रू.३०,३५०/-<br>दरवाटाघाटीनंतर<br>रू.२४,०००/- |

२१७८

| | | |
|---|---|---|
| ३. | मे. जनशक्ती संघ | रू.३०,१५०/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रू.२४,०००/-** |
| ४. | मे. कमलेश मित्र मंडळ | रू.३०,९७५/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रू.२४,०००/-** |
| ५. | मे. लष्कर बहुउद्देश सेवाभावी संस्था | रू.३०,७५०/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रू.२४,०००/-** |
| ६. | मे. लोकसेवा नागरी सेवा सहकारी संस्था | रू.३०,५५०/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रू.२४,०००/-** |
| ७. | मे. नागरीक सेवा संघ | रू.३०,८००/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रू.२४,०००/-** |
| ८. | मे. ओम साई समाज सेवा संस्था | रू.३०,०००/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रू.२४,०००/-** |

| | | |
|---|---|---|
| ९. | मे. सर्वलोक विकास सेवा मंडळ | रू.३०,१७५/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रू.२४,०००/-** |
| १०. | मे. श्रीगणेश सेवा मंडळ | रू.३०,२००/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रू.२४,०००/-** |
| ११. | मे. वाल्मिकी सेवा मंडळ | रू.३०,४००/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रू.२४,०००/-** |

एक कर्मचाऱ्यास ३० सीट्स शौचालय साफसफाई करावयाचे असून किमान वेतन, साफसफाईसाठी लागणारे साहित्य, पी.एफ., बोनस इ. पाहता दर वाटाघाटीनंतरचे दर वाजवी आहेत. तरी मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शौचालयांची दैनंदिन स्वच्छता, देखभाल करणेकामी दरवाटाघाटीनंतर वरील दरांची निविदा मान्यतेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC-6/DK/16-17/SG-40

गोषवारा प्राप्त दि. 23/3/२०१८ वेळ 9:00
मा. स्थायी समिती / [illegible] कौन्सिल
नोंद रजिस्टर अ. क्र. ११८
लिपिक
नगरसचिव विभाग,